कांदाप्रश्नी तोडगा दहा दिवसांत

शहा यांचे राज्यातील नेत्यांना आश्वासन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न १० दिवसांमध्ये सोडवले जातील, असे आश्वासन देतानाच, कांदा निर्यातीवर बंदी घालण्यात आलेली नाही, अशी माहिती केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी दिली. साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाणांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत बुधवारी राज्यातील मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने शहांशी सविस्तर चर्चा केली.

कांदा, आंबा, ऊस-साखरेच्या प्रश्नांवर लवकरच केंद्राकडून अनुकूल निर्णय घेतले जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीनंतर सांगितले. नाफेड आणि 'एनसीसीएफ'ने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात व्यापाऱ्यांकडून न होता थेट शेतकऱ्यांकडून केली जाईल, असे आश्वासन शहांनी दिले. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि 'एनसीसीएफ'ने करावी, या मागणीवरही सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला

परदेशी बाजारपेठ मिळत नाही, हे लक्षात घेऊन कांदा बियाणांवर 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला जाईल. तसेच, कांद्याचा खरेदी भाव १५.८० रुपये असून त्यात वाढ करण्याबाबत चर्चा करण्यात आली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर कोणतीही बंदी नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान व केंद्रीय सार्वजनिक वितरणमंत्री प्रल्हाद जोशी हेही उपस्थित होते. साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे शहा यांनी मान्य केले. इथेनॉलचा कोटा वाढवण्याबाबत येत्या दोन महिन्यांत निर्णय घेतला जाईल.

कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य सरकारशी चर्चा करून मार्ग काढला जाईल. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन) पैसे तात्काळ दिले जातील. ह्यक्वेल प्राइजिंगह्ल (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने प्रस्ताव मागवला असून तो लवकरच सादर केला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

मंत्र्यांचे भलेमोठे शिष्टमंडळ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले, खासदार धनंजय महाडिक, आमदार दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ राहुल आहेर, विनय कोरे, राहुल कुल, अभिमन्यु पवार, विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर आदी मंत्र्यांचा समावेश असलेले भलेमोठे शिष्टमंडळ गुरुवारी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी भेटले.

विमा कंपन्यांशी लवकरच चर्चा

आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, ही बाब त्यांच्या निदर्शनास आणली गेली. त्यावर, केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

अमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांना अटक

नागपूर : ग्रामीण पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने आंतरराज्यीय अफिम तस्करी करणाऱ्या टोळीविरोधात कारवाई करत झारखंड राज्यातील सिमडेगा येथे छापा टाकून तब्बल ३४ किलो अफिम आणि २३ लाखांहून अधिक रोकड जप्त केली. या कारवाईत एकूण २ कोटी २५ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. उमरेड-नागपूर मार्गावरील उदासा उड्डाणपुलाजवळ पोलिसांच्या पथकाने २० मे रोजी ट्रक चालक हरबंशराम सुरेशराम याला २३७ ग्रॅम अफिमसह ताब्यात घेतले होते. चौकशीदरम्यान त्याने हे अफिम झारखंड राज्यातील एकाकडून विकत घेतल्याची माहिती दिली होती. ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी विशेष तपास पथक स्थापन केले. पुरवठा साखळी भेदण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे अंकुश माने यांनी एक पथक झारखंडमधील सिमडेगा जिल्ह्यात पाठवले. हे अफिम पुरवल्या प्रकरणात पोलिसांनी तेथे भंडारटोली, करपनादास परिसरातील हॉटेल व्यावसायिक मनीषकुमार अंबिकाप्रसाद (४६) याला अटक केली.

जना स्मॉल फायनान्स बँक
(एक अनुसूचित व्यावसायिक बँक)

नोंदणीकृत कार्यालयः दी फेअरवे, तळ आणि पहिला मजला, सर्वे नं. 10/1, 11/2 आणि 12/2बी, डोमलूरच्या बाहेर, कोरमंगला इनर रिंग रोड, ईजीएल बिझनेस पार्कच्या पुढे, चल्लाघट्टा, बंगळुरू -560071.
शाखा कार्यालयः 101 आणि 102, तळमजला, परफेक्ट प्लाझा (प्रसादम), प्लॉट क्र.97, सिमेंट रोड, टेलिग्राफ कॉलनी, प्रताप नगर, नागपूर (एमएच)-440022.

ई-लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम 2002 च्या तरतुदी नियम 8(6) आणि 9 सहवाचता सिक्युरिटायजेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट (सरफेसी कायदा) 2002 अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी जाहीर सूचना

जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकार यांनी सरफेसी कायद्याच्या कलम 13(4) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. कर्जदारांना विशेषतः आणि सर्वसाधारणपणे कळविण्यात येते की, बँकेच्या थकबाकी वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा ऑनलाइन लिलाव (ई-लिलाव) **"जसे आहे, जिथे आहे आधारावर"** आणि **"जसे आहे, जे आहे आधारावर"** येथे विहित तारखेला आयोजित केला जाईलः

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	मूळ कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदाराचे नाव	13-2 सूचनेची तारीख	ताबा तारीख	रोजीनुसार सध्याची थकबाकी शिल्लक	मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ	आरक्षित किंमत भारतीय रु. मध्ये	इसारा ठेव अनामत (ईएमडी) भारतीय रु. मध्ये	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	बोली सादर करण्याची शेवटची तारीख वेळ आणि ठिकाण
1	31569420001810	1) श्री. आकाश ज्ञानदेव दामले, 2) श्री. अश्विनी ज्ञानदेव दामले	06.06.2025	16.03.2026	रु. 9,46,470.24/- (रुपये नऊ लाख बेचाळीस हजार चारशे सत्तर आणि चोवीस पैसे फक्त) दि. 06.05.2026 रोजीनुसार	दि. 06.06.2026 रोजी सकाळी 09.00 वा. ते सायं. 05.30 वा. पर्यंत	रु. 7,12,800/- (रुपये सात लाख बारा हजार आठशे फक्त)	रु. 71,280/- (रुपये एकाहत्तर हजार दोनशे ऐंशी फक्त)	दि. 17.06.2026 रोजी सकाळी 11.00 वा. ते दुपारी 2.00 वा.	दि. 16.06.2026 रोजी सायं. 05.00 वाजेपूर्वी, जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, 101 आणि 102, तळमजला, परफेक्ट प्लाझा (प्रसादम), प्लॉट क्र. 97, सिमेंट रोड, टेलिग्राफ कॉलनी, प्रताप नगर, नागपूर (एमएच)-440022.

मालमत्तेचे वर्णन/परिशिष्टः धारण जमीन ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 121/ई, अ.क्र. 328, एकूण मोजमापे 660 चौ.फूट, त्यावरील बांधकामासह, येथे स्थित बुद्ध विहारजवळ, गाव निंभोरा (बीके) ग्रामपंचायत पिवंदळ (बीके) च्या हद्दीत, तहसील तेलहारा व जिल्हा अकोला यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, **द्वारे सीमाबद्धः पूर्वेलाः** रस्ता, **पश्चिमेलाः** संपत दामले, **उत्तरेलाः** रमाबाई दामले आणि **दक्षिणेलाः** सुगंधाबाई दामले.

मालमत्ता या **"जसे आहे, जिथे आहे"** आणि **"जसे आहे, जे आहे"** या तत्त्वावर ठेवल्या जात आहेत आणि ई-लिलाव **'ऑनलाइन'** पद्धतीने केला जाईल. वरील मालमत्तेच्या खरेदीशी संबंधित सर्व देयके जना स्मॉल फायनान्स बँके यांच्या नावे केली जातील. सदर हा लिलाव बँकेच्या मान्यताप्राप्त सेवा प्रदात्या, **मेसर्स 4 क्लोजर द्वारे https://bankauctions.in** आणि **www.foreclosureindia.com** या वेब पोर्टलवर केला जाईल. अधिक माहितीसाठी आणि ई-लिलावावरील तपशील, मदत, प्रक्रिया आणि ऑनलाइन प्रशिक्षणासाठी, संभाव्य बोलीदार **मेसर्स 4 क्लोजर** यांच्यासोबत संपर्क साधू शकतात; **श्री. नितेश पवार, संपर्क क्र.: 8142000725. ईमेल आयडीः nitesh@bankauctions.in, info@bankauctions.in.** ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी अटी आणि शर्तींबद्दल अधिक माहितीसाठी आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया **जना स्मॉल फायनान्स बँकेचे अधिकारी श्री. संजय सैनी (मोबाईल नं. 9981544885), श्री. रंजन नाईक (मोबाईल नं. 6362951653) आणि श्री. कौशिक बाग (मोबाईल नं. 7019949040)** यांच्याशी संपर्क साधा. अधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार आणि ज्ञानानुसार, मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या भार, मालकी हक्काबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. कोणतीही सशर्त बोली स्वीकारली जाणार नाही. सदर ही वरील कर्जदार/ जामीनदार/गहाण ठेवणाऱ्यांना गहाण मालमत्तेसाठी नियोजित ई-लिलावाबद्दलची सूचना आहे. कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे यांना लिलावाच्या तारखेपूर्वी वर नमूद केलेली रक्कम, अद्ययावत व्याज आणि पूरक खर्चासह भरण्यास सूचित केले जाते, अन्यथा मालमत्ता विकली जाईल आणि उर्वरित देय रक्कम असल्यास, व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल.

दिनांकः 27.05.2026 स्थानः नागपूर **स्वा/- अधिकृत अधिकारी, जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

डॉ. दंदे फाउंडेशनचा वृक्षारोपण, संवर्धनासाठी पुढाकार

'एक पेड़ नाती के नाम' उपक्रम राबवणार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : नागपुरातील असह्य आणि जीवघेणे तापमान लक्षात घेता, वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धन-जतन करण्याकरिता डॉ. दंदे फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाची सुरुवात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. पिनाक दंदे यावेळी उपस्थित होते.

यावेळी गडकरी यांना दुर्मीळ 'कृष्णवड'चे रोपटे भेट देण्यात आले. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या माध्यमातून शहरात वृक्ष लावले आणि संवर्धित केले

जातील, असे ते म्हणाले.

फाउंडेशनच्यावतीने गडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांच्या सहकार्याने 'एक पेड़ नाती के नाम' हा उपक्रम राबवला जाणार आहे. शहरातील किमान दहा नगरांमधील उद्यानांमध्ये स्थानिकांच्या सहकार्याने भारतीय वंशाच्या वृक्षांचे रोपण आणि स्थानिकांच्या सहकार्याने संवर्धन केले जाईल. या दोन्ही उपक्रमांची सुरुवात पावसाळ्यात केली जाईल.

या उपक्रमाअंतर्गत दुर्मिळ होत चाललेल्या वृक्षांचे जतन, संवर्धन आणि नंतर या वृक्षांचे मल्टिप्लिकेशन करण्याकरिता फाउंडेशन काम करीत आहे. एक-दोन वर्षात या कामाची फलश्रुती समोर येईल. नागपूर-विदर्भातील तापमान लक्षात घेता, केवळ वृक्षारोपण हा उपाय नाही तर त्याचे संवर्धन झाले पाहिजे. याकरिता डॉ. दंदे फाउंडेशनने यथाशक्य पुढाकार घेतला असून, 'एक पेड़ नाती के नाम' उपक्रमासाठी ज्येष्ठ नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ. दंदे यांनी केले.

या उपक्रमात सहभागी होण्याकरिता ८७६७९२९६०७ यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

किशोर रिठे यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार प्रदान

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे महाराष्ट्रातील ज्येष्ठ निसर्ग व वन्यजीव अभ्यासक किशोर रिठे यांना शरदचंद्र मनोहर भालेराव स्मृती पुरस्कार पुण्यात प्रदान करण्यात आला. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर नाट्यगृहात आयोजित पुरस्कार सोहळ्यात अभिनेता हृषिकेश जोशी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सन २०२५ या वर्षातील विविध साहित्य प्रकारातील सर्वोत्कृष्ट साहित्य कृतींसाठी लेखकांना यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आले. किशोर रिठे यांनी लिहिलेल्या 'सातपुड्याचा सातबारा' या ग्रंथास २०२५ चा 'लक्षवेधी साहित्य ग्रंथ' म्हणून हा पुरस्कार देण्यात आला. रिठे सध्या भारतातील प्रसिद्ध व वन्यजीव क्षेत्रातील अग्रगण्य आणि सर्वात जुन्या अशा बॉम्बे नेचरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी संपूर्ण सातपुडा पर्वतराजीत ३५ वर्षे वने व वन्यजीव संरक्षणाचे कार्य केले आहे.

प्रदीर्घ अनुभवावर आधारित लिहिलेला 'सातपुड्याचा सातबारा' हा ६४७ पानांचा ग्रंथ २०२५ मध्ये पुण्याच्या पद्मगंधा प्रकाशनाने वाचकांसमोर आणला. हा पुरस्कार खऱ्या अर्थाने सातपुडा पर्वतराजीचा असून आपण फक्त त्याच्या

विविध पैलूंना आपल्या परीने या ग्रंथात मांडण्याचा प्रयत्न केला असल्याची प्रतिक्रिया किशोर रिठे यांनी व्यक्त केली. त्यांनी यापूर्वी 'रानावनाचे मूडस' व 'हिरवा संघर्ष' ही दोन पुस्तके मराठीत तर 'सातपुडा' व 'डस्क टू डॉन : अ स्टोरी ऑफ व्हिलेज रिसेटलमेंट इन मेलघाट' ही पुस्तके इंग्रजीत लिहिली आहे.

चोलामंडलम इन्वेस्टमेंट एंड फाइनेंस कम्पनी लिमिटेड
Chola — Enter a better life
कॉर्पोरेट कार्यालय : "चोला क्रेस्ट", सी54 आणि सी55, सुपर बी-4, तिरु वी का औद्योगिक वसाहत, गिंडी, चेन्नई-600032. **शाखा पत्ता :** पहिला मजला, प्लॉट क्र. C-15, चांदा इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह इस्टेट लिमिटेड, आदर्श पेट्रोल पंपच्या मागे, टोयोटा शोरूम जवळ, चंद्रपूर (महाराष्ट्र) - 442401

ताबा सूचना [नियम 8 (1) अंतर्गत]

ज्याअर्थी, खाली सही करणारा मी, मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड यांचा अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 (यापुढे "अधिनियम" असे संबोधण्यात येईल) अंतर्गत तसेच कलम 13(12) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 मधील नियम 3 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली स्तंभ [B] मध्ये नमूद केलेल्या कर्जदारांना, स्तंभ [C] मध्ये नमूद केलेल्या तारखांना, स्तंभ [D] मध्ये दर्शविलेली थकबाकी रक्कम व त्यावरील व्याज सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून 60 दिवसांच्या आत भरणा करण्याबाबत मागणी नोटिसा निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर कर्जदारांनी वरील कालावधीत थकबाकी रक्कम भरण्यास अपयश आल्यामुळे, याद्वारे विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या स्तंभांमध्ये वर्णन केलेल्या आणि कंपनीकडे तारण ठेवलेल्या मालमत्तांचा **सांकेतिक ताबा**, स्तंभ [E] मध्ये नमूद केलेल्या तारखांना, अधिनियमाच्या कलम 13(4) सह नियम 8 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली सही करणाऱ्याने घेतलेला आहे. याद्वारे कर्जदारांना विशेषतः तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मालमत्तांशी कोणताही व्यवहार करू नये. असे कोणतेही व्यवहार मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड यांचा स्तंभ [D] मध्ये नमूद केलेल्या रकमेवर तसेच त्यावरील व्याज व इतर खर्च/शुल्कांवरील हक्क (चार्ज) अधीन राहतील. सिक्युरिटायझेशन अधिनियमाच्या कलम 13(8) अन्वये, विक्रीची अधिसूचना जारी होण्यापूर्वी, कर्जदारांना संपूर्ण थकबाकी रक्कम तसेच सर्व खर्च, शुल्क व इतर देणी भरून सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्याचा (Redeem करण्याचा) अधिकार आहे.

अनु क्र. [A]	कर्जदाराचे नाव आणि पत्ता आणि कर्ज खाते क्र. [B]	मागणी सूचनेची तारीख [C]	थकबाकी रक्कम [D]	ताब्याची तारीख [E]
1	कर्ज खाते क्र. HE01CDP00000074609 व HE01CDP00000120949 1. धवल भरत राजा (अर्जदार), 2. बी. आर. इन्फ्रा (सह-अर्जदार), 3. हर्षाबेन भरत राजा (सह-अर्जदार) 4. अपेक्षा धवल राजा (सह-अर्जदार) 5. स्नेहा हिरेंद्र राजा (सह-अर्जदार) 6. हिरेंद्र भरत राजा (सह-अर्जदार) पत्ता: गुरुदेव मेडिकलच्या मागे, देना बँकेजवळ, बाजार वॉर्ड, चंद्रपूर, महाराष्ट्र - 442401 7. स्नेहा हिरेंद्र राजा (सह-अर्जदार) पत्ता: D/o. गोपाल सरडा, रामकृष्ण अपार्टमेंट, गंज वॉर्ड, अकोला अर्बन बँकेजवळ, चंद्रपूर, महाराष्ट्र - 442401 8. धवल कन्स्ट्रक्शन (सह-अर्जदार) पत्ता: 01, गुरुदेव मेडिकलच्या मागे, बाजार वॉर्ड, चंद्रपूर, महाराष्ट्र - 442401 9. अपेक्षा धवल राजा (सह-अर्जदार)पत्ता: धवल राजा यांची पत्नी, बाजार वॉर्ड, चंद्रपूर, महाराष्ट्र - 442401	13/03/2026	13/03/2026 रोजी रु. 28333488.00/- आणि त्यावरील व्याज.	25/05/2026

अचल संपत्ति का विवरण:- **मालमत्ता क्र. 1** जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा क्षेत्रफळ: 113.30 चौ. मी. तसेच त्यावरील बांधकाम, सिटी सर्व्हे क्र. 6240, शीट क्र. 50 (ब्लॉक क्र. 50 व प्लॉट क्र. 60), मौजा नाझुल, मोहल्ला बनापेठ, चंद्रपूर, ता. व जि. चंद्रपूर येथे स्थित मालमत्ता. **सदर मालमत्तेच्या चतुर्सिमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस :** श्री. उपलेतावाला यांचे घर, **पश्चिमेस :** श्री. शोभागमल बजाज यांच्या मालकीची जमीन, **उत्तरेस :** श्री. भरत राजा यांचे घर, **दक्षिणेस :** श्री. नागोराव चौधरी यांचे घर
मालमत्ता क्र. 2 जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा क्षेत्रफळ: 106.8 चौ. मी. तसेच त्यावरील बांधकाम, सिटी सर्व्हे क्र. 3462, शीट क्र. 39 (ब्लॉक क्र. 39 व प्लॉट क्र. 83), मौजा नाझुल, मोहल्ला बनापेठ, चंद्रपूर, ता. व जि. चंद्रपूर येथे स्थित मालमत्ता. **सदर मालमत्तेच्या चतुर्सिमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस :** श्री. भुगुरवार यांचे घर, **पश्चिमेस :** श्री. प्रेमचंद रांदर यांचे घर, **उत्तरेस :** श्री. बजाज यांचे घर, **दक्षिणेस :** याकूबभाई यांचे मोकळे अंगण व दुकान
मालमत्ता क्र. 3 जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा कक्षेत्रफळ: 120.12 चौ. मी. तसेच त्यावरील बांधकाम, सिटी सर्व्हे क्र. 3461, शीट क्र. 39 (जुनी शीट क्र. 8, ब्लॉक क्र. 39 व प्लॉट क्र. 84), मौजा नाझुल, मोहल्ला बनापेठ, चंद्रपूर, ता. व जि. चंद्रपूर येथे स्थित मालमत्ता. **सदर मालमत्तेच्या चतुर्सिमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस :** श्री. पुरुषोत्तम माधवराव भुगुरवार यांच्या मालकीची मालमत्ता, **पश्चिमेस :** प्रेम मारवाडी यांच्या मालकीची विहीर व गोदाम, **उत्तरेस :** एम.सी. रोड, **दक्षिणेस :** शोभागमल बजाज यांच्या मालकीचे गोदाम

दिनांक : 25/05/2026 **ठिकाण : चंद्रपूर**
प्राधिकृत अधिकारी, मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

punjab national bank — Together for the better

भारग्रस्त मत्ता व्यवस्थापन शाखा, मुंबई
पीएनबी प्रगती टॉवर, पहिला मजला, प्लॉट सी-9, ब्लॉक जी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-400051, ईमेल zs8356@pnb.bank.in

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) मधील तरतुदीसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अ‍ॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/ भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा बँकेच्या / सुरक्षित धनकोच्या प्राधिकृतअधिकारयांनी **सांकेतिक/प्रत्यक्ष ताबा** घेतलेला असून (प्रत्यक्ष ताब्यासाठी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाला आहे) तिची संबंधित कर्जदार व जामीनदार यांचेकडून बँकेस / सुरक्षित धनकोस घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठीदि. 16.06.2026 रोजी स. 11.00 ते दु. 4.00 वाजेपर्यंत, आवश्यक वाटल्यास 10 मिनिटांच्या कालविस्तारांसह,**"जशी आहे जेथे आहे"**, **"जशी आहे जे काही आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.
आरक्षित किंमत व बयाणा रक्कम खालील तक्त्यात सदर मालमत्तांच्या समोर नमूद करण्यात आली आहे.

अनामत मत्तेचे वर्णन

अ. क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार/जामीनदार खात्याचे नाव आणि पत्ता	तारण अचल मालमत्तांचे वर्णन / मालकाचे नाव (मालमत्तांचे गहाणकार)	अ) सर्फेसी अधिनियम 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना दिनांक ब) 30.06.2025 रोजीची थकबाकी रक्कम क) सर्फेसी अधिनियम 2002 मधील अनुच्छेद 13(4) अंतर्गत ताबा सूचना ड) ताब्याचे स्वरूप सांकेतिक / प्रत्यक्ष / रचनात्मक	अ) आरक्षित किंमत / ब) बयाणा रक्कम / क) बोली वृद्धी रक्कम	ई-लिलाव दिनांक / वेळ	सुरक्षित धनको यांना ज्ञात असलेल्या बोज्यांचा तपशील
1	एसएएमबी, मुंबई पीएनबी प्रगती टॉवर, पहिला मजला, जी-ब्लॉक, सी-9, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051. मेल: zs8356@pnb.bank.in i) मे. सिंध गारमेंट्स (कर्जदार) ii) श्री. संजय प्रेमचंद हरवानी (भागीदार / गहाणकार आणि दिवंगत श्री. प्रेमचंद नरुमल हरवानी, गहाणकार मृत असल्याने त्यांचे कायदेशीर वारस) iii) श्री. संकल्प संजय हरवानी (भागीदार) iv) श्री. अनिल प्रेमचंद हरवानी (जामीनदार / गहाणकार आणि तसेच कायदेशीर वारस v) श्री श्यामलाल चंदनमल नोटवानी (जामीनदार / गहाणकार) vi) श्रीमती रेखा श्यामलाल नोटवानी (जामीनदार / गहाणकार) vii) श्री. प्रमोद मोतीरामजी राठोड (जामीनदार / गहाणकार) viii) श्री. दिलीप रिधोमल हरवानी (जामीनदार / गहाणकार) ix) श्रीमती भावना अनिल कपूर (जामीनदार)	**मालमत्ता क्र. 1** निवासी सदनिका क्र. 202, पहिला मजला, सरस्वती वास अपार्टमेंट, प्लॉट क्र. 30 मध्ये 10% अविभाजित हिस्सा, क्षेत्रफळ सुमारे 4230 चौ.फु. (392.979 चौ.मी.), सर्वे क्र. 81, मौजा राजापेठ, आईस फॅक्टरी जवळ, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती. मालक- श्री. दिलीपकुमार रिधोमल हरवानी	अ) 13.02.2025 ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के. क) 04.06.2025 ड) प्रत्यक्ष ताबा (प्रत्यक्ष ताब्यासाठी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाला)	अ) रु. 27,28,000/- ब) रु. 2,72,800/- क) रु. 50,000/-	16/06/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही
		मालमत्ता क्र. 2: व्यावसायिक दुकान क्र. 118, पहिला मजला, श्री बालाजी मार्केट कॉम्प्लेक्स, महानगर पालिका घर क्र. 342 ए (भाग), वॉर्ड क्र. 26ए, बिल्ट-अप क्षेत्रफळ 236.174 चौ.फु. (21.941 चौ.मी.), दुकान क्र. 222, दुसरा मजला, श्री बालाजी मार्केट कॉम्प्लेक्स, महानगर पालिका घर क्र. 342 टी (भाग), वॉर्ड क्र. 26ए आणि बिल्ट-अप क्षेत्रफळ 209.064 चौ.फु. (19.422 चौ.मी.), प्लॉट क्र. 77/2 आणि 77/2/एबीसी, महानगर पालिकेच्या हद्दीत, आम्रपाली हॉटेल जवळ, जवाहर रोड, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती. मालकः डॉ. श्री अनिल प्रेमचंद हरवानी	अ) 13.02.2025 ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के. क) 04.06.2025 ड) सांकेतिक ताबा(प्रत्यक्ष ताब्यासाठी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाला)	अ) रु. 22,18,000/- ब) रु. 2,21,800/- क) रु. 50,000/-	16/06/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही
		मालमत्ता क्र. 3 निवासी बंगलो प्लॉट क्र. 04 (भाग) आणि प्लॉट क्र. 5, एकूण क्षेत्रफळ सुमारे 3422.00 चौ.फु. (318.96 चौ.मी.), सर्वे क्र. 88 (नवीन), हरवानी हॉस्पिटल जवळ, दस्तूर नगर रोड, विवेकानंद कॉलनी, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती. मालकः श्री. संजय कुमार प्रेमचंद हरवानी	अ) 13.02.2025 ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के. क) 04.06.2025 ड) सांकेतिक ताबा(प्रत्यक्ष ताब्यासाठी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाला)	अ) रु. 2,42,05,000/- ब) रु. 24,20,500/- क) रु. 1,00,000/-	16/06/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही
		मालमत्ता क्र. 4 व्यावसायिक दुकान क्र. 401 ते 420, चौथा मजला, बिल्ट-अप क्षेत्रफळ 363.82 चौ.मी., ड्रीम्स लँडमार्क या इमारतीत, प्लॉट क्र. 127/4, 123(भाग)एम, 127/5, 124/2, 122 (भाग), अमरावती -बडनेरा मेन रोड, राजकमल चौक, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती. मालकः मे. ड्रीम्झ इन्फ्रास्ट्रक्चर द्वारे त्यांचे भागीदार श्री. संजय प्रेमचंद हरवानी आणि श्री नरेंद्र गोपीचंद हरवानी	अ) 13.02.2025 ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के. क) 04.06.2025 ड) सांकेतिक ताबा(प्रत्यक्ष ताब्यासाठी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाला)	अ) रु. 3,01,15,000/- ब) रु. 30,11,500/- क) रु. 1,00,000/-	16/06/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही
		मालमत्ता क्र. 5 व्यावसायिक दुकान क्र. बी6-001 ते बी-6-040, एकूण चटई क्षेत्रफळ सुमारे 3468.80 चौ.मी. आणि बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 3762.14 चौ.मी. (40495.67 चौ.फू.), तळ मजला आणि पहिला मजला (या मेझनीन/पहिल्या मजल्याचा समावेश आहे), त्यापैकी विंग-बी, ड्रिम्झलँड बिजनेस पार्क, मौजे बोरगाव, प्रगणे नांदगाव पेठ, तहसील व जिल्हा अमरावती. सर्व दुकाने आतून एकमेकांना जोडलेली आहेत आणि ते एकच युनिट/शोरूम आहे असे समजण्यात येते. मळकः श्री प्रेमचंद नारुमल हरवानी, श्री संजय प्रेमचंद हरवानी (द्वारे आममुखत्यार श्री विकी रुपचंद शादी)	अ) 13.02.2025 ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के. क) 04.06.2025 ड) सांकेतिक ताबा(प्रत्यक्ष ताब्यासाठी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाला)	अ) रु. 10,86,38,000/- ब) रु. 1,08,63,800/- क) रु. 5,00,000/-	16/06/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही

अटी व शर्तीः
1. सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती आणि पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल. डीआरटी, नागपूर येथे एसए क्र. 198/2025 प्रलंबित आहे. ही लिलाव विक्री **https://baanknet.com** या ई-लिलाव पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन असेल.
2 .इच्छुक बोलीदार / खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या ईमेल-आयडी आणि मोबाइल क्रमांकाचा वापर करून (https:/baanknet.com) या पोर्टलवर नोंदणी करून घ्यावी. ई-केवायसी ची प्रक्रिया डिजीलॉकरद्वारे पार पाडण्यात येईल. ई-केवायसी झाल्यानंतर इच्छुक बोलीदार / खरेदीदार ऑनलाइन/चलन माध्यमाने त्यांच्या पोर्टलमधील त्यांच्या ई-वॉलेटमध्ये ई-लिलाव दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी बयाणा रक्कम हस्तांतरित करू शकतील. नोंदणी, ई-केवायसीचे सत्यापन, वॉलेटमध्ये बयाणा रक्कम हस्तांतरित तसेच वॉलेटमधील रक्कम मालमत्तेशी लिंक करणे या सर्व प्रक्रिया लिलावास पुरेसा कालावधी असताना पूर्ण केल्या जाव्यात.
3. वर नमूद केलेली बयाणा रक्कम ऑनलाइन/चलन माध्यमातून जमा करण्यात यावी तसेच ती बोलीदाराच्या ई-वॉलेटमध्ये जमा करण्यात येईल. ऑनलाइन पद्धतीने बयाणा रक्कम जमा न करणारया बोलीदारांना ई-लिलावात सहभागी होता येणार नाही. बयाणा रकमेवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.
4. ई-लिलावासाठी प्लॅटफॉर्म (https://baanknet.com) ई-लिलाव सेवा पुरवठादार **मे. पीएसबी अलायन्स प्रा. लि. नोंदणीकृत कार्यालय युनिट 1, तिसरा मजला, वीआयओएस कमर्शियल टॉवर, वडाळा ट्रक टर्मिनस, वडाळा पूर्व, मुंबई- 400037 (मदतकक्ष क्रमांक +91 8291220220, ईमेल आयडीः support.ebkray@psballiance.com)** यांच्या द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. इच्छुक बोलीदारांना ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ई-लिलाव सेवा पुरवठादाराची वेबसाईट https://baanknet.coचा वापर करावा लागेल. ई-लिलावाचे ऑनलाइन प्रात्यक्षिक / प्रशिक्षण सेवा पुरवठादाराद्वारे पोर्टलच्या माध्यमाने पुरवण्यात येईल.
5. विक्रीच्या सामान्य नियम व अटींचा समावेश असलेली विक्री सूचना पुढील वेबसाईटवर / वेब पेज पोर्टलवर उपलब्ध / प्रकाशित करण्यात आली आहे. (1) https://baanknet.com (2) www.pnbindia.in
6. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्यांना विक्री सूचनेच्या प्रती, ई-लिलावाच्या नियम व अटी, सदर ई-लिलावाशी संबंधित ई-लिलावाच्या परिचालनात्मक भागावरील हेल्प मॅन्युअल ई-लिलाव पोर्टल (https://baanknet.com) वरून विनामूल्य डाउनलोड करता येईल.
7. बोलीच्या वेळी बोलीदाराच्या ई-वॉलेटमध्ये पुरेशी शिल्लक रक्कम (>=बयाणा रक्कम) असणे आवश्यक आहे.
8. ई-लिलावादरम्यान बोलीदारांना त्याआधी देण्यात आलेल्या बोलीपेक्षा अधिक किमतीची आपसांत बोली करता येईल आणि बोली रकमेत करण्यात येणारी वाढ नमूद वृद्धी मूल्याएवढी असावी. बोलीदारांना पुढील उच्च बोली देण्यासाठी 10 मिनिटांचा कालावधी देण्यात येईल आणि मागील सर्वोच्च बोलीपासून 10 मिनिटे संपल्यानंतर कुणाही बोलीदाराने आणखी उच्च बोली न दिल्यास ई-लिलाव समाप्त करण्यात येईल.
9. ई-लिलावाची विक्री सूचना, नियम व अटी, ई-लिलावाशी संबंधित ई-लिलावाच्या परिचालनात्मक भागावरील हेल्प मॅन्युअल चांगल्या प्रकारे वाचून त्यांचे पालन करण्याची जबाबदारी इच्छुक बोलीदाराची असेल.
10. ई-लिलाव प्रक्रियेपूर्वी किंवा त्या दरम्यान होणतीही अडचण उद्भवल्यास किंवा मदत हवी असल्यास बोलीदार ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. पीएसबी अलायन्स प्रा. लि. यांच्या अधिकृत प्रतिनिधींशी संपर्क साधू शकतात ज्याचा तपशील (https://baanknet.com) येथे उपलब्ध आहे.
11. प्राधिकृत अधिकारयाद्वारे ई-लिलाव निश्चित झाल्यानंतर आमच्या सेवा पुरवठादाराद्वारे एसएमएस/ईमेल द्वारे (त्यांनी दिलेल्या / सेवा पुरवठादाराकडे नोंदणीकृत असलेल्या मोबाइल क्र./ईमेल अ‍ॅड्रेसवर) केवळ यशस्वी बोलीदारांना कळवण्यात येईल.
12. आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस अनामत मत्तेची विक्री करण्यात येणार नाही.
13. यशस्वी बोलीदारास बयाणा रक्कम वजा करून बोली रकमेच्या 25% (पंचवीस टक्के) रक्कम त्याच दिवशी किंवा फारतर त्यापुढील कार्यालयीन दिवशी जमा करावी लागेल आणि उर्वरित रकमेचा भरणा लिलाव दिनांकापासून 15 दिवसांचे आत शेड्यूल्ड कमर्शियल बँकेने जारी / हस्तांतरित केलेल्या एनईएफटी/आरटीजीएस/ट्रान्स्फर च्या माध्यमातून खात्याचे नावः संड्री- एनपीए / सर्फेसी / लिलाव संबंधित, खाते क्र.: 8356003171118ए, आयएफएससीः PUNB0835600, शाखाः एसएएमबी मुंबई, बँकः पंजाब नॅशनल बँक यांच्या नावे करण्यात यावा. विहित कालावधीत वर नमूद रक्कम जमा करण्यात न आल्यास यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम बँकेद्वारे जप्त करण्यात येईल आणि प्राधिकृत अधिकारयास मालमत्तेचा नव्याने लिलाव / विक्री करण्याची मोकळीक असेल तसेच कसूर करणारया बोलीदारास रकमेवर तसेच मालमत्तेवर कोणताही दावा सांगता येणार नाही.
14. यशस्वी बोलीदाराद्वारे विक्रीच्या संबंधाने देण्यात येणारी रक्कम प्राप्ती कर अधिनियम, 1961 च्या अनुच्छेद 194-1ए अंतर्गत टीडीएस च्या अधीन असेल तसेच यशस्वी बोलीदारास उर्वरित 75% रक्कम जमा करतेवेळी / संपूर्ण बोली रक्कम जमा करतेवेळी टीडीएस चा भरणा करावा लागेल.
15. स्वीकारयोग्य न वाटल्यास कोणातीही बोली स्वीकारण्याचा किंवा सर्व बोली नाकारण्याचा किंवा लिलाव पुढे ढकलण्याचा / रद्द करण्याचा / खंडित करण्याचा / चालू न ठेवण्याचा किंवा लिलावाच्या अटींमध्ये कोणत्याही वेळी बदल करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारयाकडे राखीव आहे आणि या संदर्भात त्यांचा निर्णय अंतिम असेल.
16. अधिनियमातील तरतुदींनुसार पूर्ण बोली रक्कम जमा केल्यानंतर यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्री प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.
17. सदर मालमत्तेची **"जसे आहे जेथे आहे तत्वावर"**, **"जसे आहे जे काही आहे तत्वावर"** आणि **"तेथे जे काही आहे या तत्वावर"** विक्री करण्यात येईल.
18. वर परिशिष्टात नमूद अनामत मत्तेचा तपशील प्राधिकृत अधिकारयाकडे असलेल्या सर्वोत्तम माहितीच्या आधारे देण्यात आला आहे, तरी सदर घोषणेत कोणतीही त्रुटी असल्यास, चुकीची माहिती असल्यास किंवा कोणतीही माहिती वगळली गेली असल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी जबाबदार नसतील.
19. बोली सादर करण्यापूर्वी अनामती किंवा तिच्या तपशीलाबाबत चौकशी करून स्वतःचे समाधान करून घेण्याची जबाबदारी बोलीदाराची असेल. येथे पुरवण्यात आलेल्या तपशीलानुसार बोलीदाराने संबंधित अधिकारयाशी संपर्क करून मालमत्तेची पाहणी करून घ्यावी.
20. सर्व वैधानिक थकबाकी / आनुषंगिक शुल्के / इतर थकबाकी ज्यात नोंदणी शुल्के, मुद्रांक शुल्क, कर इत्या. चा समावेश होतो यांचा भार खरेदीदारास उचलावा लागेल.
21. बँकेस ज्ञात नसलेले संबंधित मालमत्तेवरील (ई-लिलावीत) सरकारचे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही शुल्क, धारणाधिकार, बोजे, तसेच इतर कोणत्याही थकबाकीची जबाबदारी प्राधिकृत अधिकारी किंवा बँकेची नसेल. इच्छुक बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, वीज बिल इत्या. सारख्या मालमत्तेवरील बोज्यांच्या बाबतीत स्वतंत्रपणे चौकशी करावी.
22. सुयोग्य इंटरनेट जोडणी, पावर बॅक-अप इत्या. यांची खात्री बोलीदाराने करावी. इंटरनेट बंद पडल्यामुळे, वीज खंडित झाल्यामुळे किंवा कोणत्याही तांत्रिक कारणामुळे / ई-लिलावावर प्रभाव टाकणारया आकस्मिक घटनेसाठी बँक जबाबदार नसेल.
23. आपला प्रतिनिधी नेमून त्याद्वारे स्वबोली लावून लिलावात सहभागी होण्याचे स्वातंत्र्य बँकेकडे आहे.
विक्रीच्या तपशीलवार नियम व अटींसाठी कृपया **https://baanknet.comआणि www.pnbindia.in** येथे भेट द्यावी.

दिनांक:28.05.2026
स्थानः अमरावती
प्राधिकृत अधिकारी पंजाब नॅशनल बँक सुरक्षित धनको

सर्फेसी अधिनियम, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत वैधानिक विक्री सूचना